# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## सप्टेंबर २०२५




# ई वार्ता

N

**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२८०१/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# मफुकृवि ई वार्ता

सप्टेंबर २०२५

वर्ष : ५, अंक क्र. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषिमंत्री मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांची देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट





**दि.२ सप्टेंबर, २०२५.** महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास भेट देत प्रकल्पातील विविध उपक्रमांची पाहणी केली. भेटीदरम्यान त्यांनी शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांशी संवाद साधत केंद्रातील गाईंच्या देशी जातींबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यांनी प्रकल्पातील दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गायी, नवीन पर्यावरण पूरक गोठे, गोबर गॅस प्रकल्प, गोपरीक्रमा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या संशोधन व प्रशिक्षण उपक्रमांचे कौतुक केले. प्रकल्पात उभारण्यात येत असलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये अद्ययावत गायींचे गोठे, सायलो बंकर, बायोगॅस युनिट, कंपोस्टिंग आणि स्टोरेज युनिट्स, प्रयोगशाळा, शेतकरी वसतीगृह, प्रशिक्षण हॉल, प्रशासकीय इमारत, सेल्स काउंटर तसेच देशी गाईंच्या प्रचार प्रसारासाठी गो–पर्यटन केंद्र इत्यादी सुविधा आगामी काळात उपलब्ध होणार आहेत. या बांधकामाची पाहणी करताना कृषिमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

याप्रसंगी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. तुषार पवार, राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश कांबळे, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. समीर ढगे, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे विविध शास्त्रज्ञ या वेळी उपस्थित होते. प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी कृषिमंत्र्यांना प्रकल्पाची संपूर्ण माहिती सादर केली. कृषिमंत्री भरणे यांनी केंद्राच्या कार्याची मनःपूर्वक प्रशंसा करून प्रकल्पाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात राहुरी चॅप्टरअंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन



**दि. २९ सप्टेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राहुरी चॅप्टर, भारतीय मृदा शास्त्र संस्था, मृदाशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथील भारतीय मृदाशास्त्र संस्था, ३१ वे डॉ. डी.पी. मोतीरमाणी मेमोरीयल व्याख्यान–२०२५ च्या अंतर्गत माती–वनस्पती प्रणालीतील बहुकार्यात्मक चिकणमाती खनिजे : यंत्रणा, बदल आणि अनुप्रयोग या विषयावरील व्याख्यानाचे

आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मृदा शास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभागाचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. के.एम. मनजहा उपस्थित होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके व मृदविज्ञान विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की चिकण मातीच्या कणांमुळे मातीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढते तसेच रासायनीक खतांचा कार्यक्षमपणे वापर होतो, त्याचबरोबर मातीमधील प्रदुषण थांबविणे शक्य होते. पिकांच्या उत्पादनवाढीसाठी अन्नद्रव्ये आवश्यक असतात. चिकण मातीच्या कणांमुळे अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन योग्य रितीने होते. अशा प्रकारे चिकण मातीच्या कणांचे महत्व अनन्यसाधारण आहे. यावेळी डॉ. के.एम. मनजहा आपल्या भाषणात म्हणाले की चिकणमातीचे कण आणि नॅनो खतांचा वापर करुन खते निर्मिती करणे व त्याचा पीक उत्पादनासाठी वापर करता येतो. सूक्ष्म व मुख्य अन्नद्रव्यांचा वापर करुन विविध प्रकारच्या जमिनींमध्ये पीक उत्पादनात वाढ करणे शक्य आहे. चिकण मातीचे कण हे नॅनो खतांद्वारे तयार केलेल्या खतांमुळे होणारे वातावरणीय प्रदुषण कमी करु शकतात. खत वापरामध्ये २० टक्क्यांपर्यंत खतांची बचत होऊ शकते तसेच जडधातूंमुळे होणारे प्रदुषण कमी करता येते. त्यांनी यावेळी मातीची संरचना, त्यामध्ये होणारे बदल, चिकण मातीच्या कणांची निर्मिती व उपयोग याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भिमराव कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विविध विभाग प्रमुख, पुणे, धुळे, कोल्हापूर व हाळगाव येथील मृदाशास्त्रज्ञ, विद्यापीठातील मृदाशास्त्र विभागातील प्राध्यापक, आचार्य व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये यशाचे मानसशास्त्र या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन




**दि. २४ सप्टेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी येथील रोटरी क्लब व सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने यशाचे मानसशास्त्र या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक येथील प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व माजी सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सिताराम कोल्हे उपस्थित होते. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, राहुरी रोटरी क्लबचे सचिव डॉ. जयंत कुलकर्णी, रोटरी क्लबचे अध्यक्ष इंजि. अविनाश साबरे, सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अरुण तुपविहीरे व सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब खेत्री उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. सातप्पा खरबडे म्हणाले की सध्या कृषि शिक्षणाकडे मुलांचा ओढा वाढला आहे. कृषि शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मानसशास्त्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध शैक्षणिक उपक्रम राबविताना नीतिशास्त्र व मानव संसाधने हे विषय खूप महत्त्वाचे आहेत. आपले करिअर यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी सदैव सकारात्मक विचार केला पाहिजे. जसा तुम्ही विचार कराल तशी तुम्हाला प्रचीती येईल. सकारात्मक विचारानेच यश मिळेल. यावेळी डॉ. सीताराम कोल्हे

वर्ष :५, अंक क्रं. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मार्गदर्शन करतांना म्हणाले की १०० व्यक्तींपैकी ८४ व्यक्ती आपले ध्येय ठरवत नाहीत, १३ व्यक्ती फक्त मनामध्ये ध्येय ठरवतात तर तीन व्यक्ती पेन व वहीच्या सहाय्याने ध्येय ठरवतात, निश्चित करतात व जीवनात यश मिळवतात. जगातील फक्त दोन टक्के व्यक्ती अशा आहेत की ज्यांना आपली क्षमता माहीत असते. तुम्हाला तुमच्या असामान्यत्वाची जाणीव व्हायला हवी. यासाठी स्वतःला सर्वश्रेष्ठ समजा, उच्च ध्येय ठेवा व कितीही मोठी संकटे आली तरीही तुम्ही यशस्वी होणारच याची खात्री बाळगा. हे ब्रह्मांड तुम्हाला बक्षीस किंवा शिक्षा देत नाही तर ते तुम्हाला प्रतिसादच देते. तुम्ही जसं ठरवाल, जसे वागाल, जे मागाल तेच तुम्हाला या ब्रह्मांडाकडून मिळेल. जीवनात दोन रस्ते आहेत. एक आहे सोपा, दुसरा आहे यशस्वी होण्याचा अवघड रस्ता. सोप्या रस्त्याने गेले तर यश मिळत नाही हे नेहमी लक्षात ठेवा. यावेळी डॉ. कोल्हे यांनी पावर पॉइंटद्वारे सादरीकरण करून विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराद्वारे संवाद साधला.

डॉ. सचिन नलावडे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी यशाचा मार्ग दाखविणे आवश्यक आहे. यशस्वी होण्यासाठी प्रयत्न सगळेच करतात परंतु मार्गदर्शक बनून जेव्हा शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतात त्यावेळी मिळणारे यश हे अधिक आनंद देणारे असते. तुमच्या शिक्षकांनी जे शिकवलं त्यामुळे तुम्ही यशस्वी झालात तर तुम्ही या समाजाला परत काहीतरी द्यायचे आहे हे लक्षात ठेवा. अशा कार्यक्रमांचे आयोजन करणे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी आवश्यक असून यातून नक्कीच विद्यार्थी घडतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. अविनाश साबरे यांनी केले. यावेळी जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षक श्री. अरुण तुपविहिरे, श्री. सुनील लोंढे, सौ. जयश्री इंगळे तसेच महाराष्ट्र शासनाचे आयडॉल टिचर म्हणुन जिल्हास्तरीय निवड झालेले शिक्षक श्री. विलास देशमुख व श्री. संजय लाटे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नीट परिक्षेतील यशाबद्दल व मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयात मिळालेल्या प्रवेशाबद्दल कु. समीधा साकुरे या विद्यार्थीनीचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी श्री. सुनील लोंढे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. हलीम शेख यांनी तर आभार डॉ. जयंत कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तांभेरे येथे तीन दिवसीय सुधारित कृषि अवजारे व यंत्रांचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके प्रशिक्षणाचे आयोजन





**दि. १० सप्टेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाद्वारे भारत सरकारच्या शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत असलेल्या केंद्रीय कृषि मशनरी प्रशिक्षण आणि परीक्षण संस्था, बुदनी, मध्य प्रदेश यांनी मौजे तांभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) या गावात महिलांसाठी तीन दिवसीय सुधारित कृषि अवजारे व यंत्रांचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, बुदनी येथील केंद्रीय कृषि मशिनरी प्रशिक्षण आणि परीक्षण संस्थेचे वरिष्ठ तंत्रज्ञान सहाय्यक इंजी. खजेंद्र बोरा, वरिष्ठ टेक्निशियन अनिश मालविया, राहुरी येथील सुलभ इरिगेशनचे संचालक दत्तात्रय कवाणे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ, जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख, ग्रामसेवक राजेंद्र ओहोळ, डॉ. रविकिरण राठोड उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की दिवसेंदिवस शेतीमध्ये मजुरांची कमतरता भासत आहे. शेतीमध्ये

काम करतांना महिलांना अधिकचे श्रम करावे लागत आहेत. शेतीमधील अधिक तर कामे महिला करतात. कृषि विद्यापीठांनी व अनेक संस्थांनी महिलांचे श्रम कमी करणारी अवजारे विकसित केलेली आहेत. महिलांना कृषि यंत्र व अवजारांचे ज्ञान देऊन प्रशिक्षण दिले तर ग्रामीण भागातील शेती समृद्ध होईल. महिलांचे श्रम कमी करायचे असतील तर शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे आहे. यावेळी डॉ. सचिन नलावडे मार्गदर्शन करताना म्हणाले की या प्रशिक्षणातून महिलांनी अवजारे व यंत्रे यांचे तंत्रज्ञान जाणून  घ्या, आत्मसात करा. कुटुंबातील एक स्त्री कृषि अवजारे व तंत्रज्ञानामध्ये प्रशिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब तंत्रज्ञान साक्षर होईल. शेती करताना स्मार्ट शेती करा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये डॉ. बास्टेवाड यांनी महिलांचे श्रम कमी करणाऱ्या सुधारीत मनुष्यचलीत कृषि अवजारे यांची माहिती व प्रात्यक्षीक दाखविले. याप्रसंगी दत्तात्रय कवाणे यांनीही विविध कृषि अवजारे व यंत्रांचे प्रात्यक्षीक दाखविले. या प्रशिक्षणामध्ये तीनही दिवस कृषि अवजारांची माहिती देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रविकिरण राठोड, सलीम शेख, राहुल कोऱ्हाळे व किरण मगर यांनी अथक परिश्रम घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला तांभेरे गावातील शंभरहून अधिक महिलांनी सहभाग नोंदविला.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात दीक्षारंभ व अभियंता दिवस साजरा



**दि. १५ सप्टेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दीक्षारंभ व अभियंता दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील किसान कार्पोरेशन या कंपनीचे प्रमुख इंजि. शैलेंद्र अडसुरे उपस्थित होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, कृषि प्रक्रीया अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास कांबळे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, कृषि अवजारे व यंत्रे प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे व सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. सचिन नलावडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की या महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी आपण प्रवेश घेतला आहे. येथे शिक्षण घेत असतांना स्वतःला ओळखा, भविष्यात काय करायचे आहे ते ठरवा, ते पूर्ण करण्यासाठी समर्पण करा. कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतल्यानंतर विविध क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. यासाठी अधिक जागृत राहून अभियांत्रिकीच्या विषयांबरोबरच विविध संधीचा फायदा घेऊन विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडवावे. जगाचा पोशिंदा जो शेतकरी आहे त्याच्या जीवनात आनंद निर्माण होईल असे संशोधन करुन दाखवा. आज अभियंता दिवस आहे आणि आपण सर्वांनी या क्षेत्रात पदार्पन केले आहे. श्री. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस अभियंता दिवस म्हणुन साजरा करतो. यावेळी प्रमुख पाहुणे इंजि. शैलेंद्र अडसुरे म्हणाले की तुम्हाला पुढे काय करायचे आहे हे स्वतः ठरवा. स्वतःचे निर्णय स्वतः घ्या. आवड आहे तेच क्षेत्र करियरसाठी निवडा. त्यासाठी कठोर मेहनत करा. तुमच्या आयुष्यातील ठराविक काळच तुम्हाला खुप मेहनत करावी लागेल परंतु त्याला कोणताही पर्याय नाही. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी कशा प्रकारचे करिअर निवडावे यासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. विक्रम कड, डॉ. कैलास कांबळे, डॉ. विरेंद्र बारई, डॉ. शैलेंद्र गडगे व डॉ. प्रविण कदम यांनी आपल्या विभागासंबंधीची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या

वर्ष :५, अंक क्रं. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

सुरुवातीला डॉ. कैलास कांबळे यांनी विद्यार्थ्यांना दीक्षारंभ कार्यक्रम व अभियंता दिवसाबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी पहिल्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच त्यांचे पालक यांचे गुलाब पुष्प देवून मान्यवरांनी स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठात कांद्याच्या उत्पादन खर्चावर विचार मंथन बैठक संपन्न



**दि. ३० सप्टेंबर, २०२५.** कांदा पिकाचे जटिल प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या श्री. पाशा पटेल यांच्या समितीची चौथी बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठात पार पडली. यावेळी कांदा धोरण समिती आणि राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, समितीचे सदस्य तथा कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा कांदा पैदासकर डॉ. बी.टी पाटील, राजगुरुनगर येथील कांदा लसूण संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. थंगा स्वामी, पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संजय कदम, महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे व्यवस्थापक श्री. सुहास काळे व पीक उत्पादन खर्च योजनेचे प्रमुख डॉ. रोहित निरगुडे उपस्थित होते.

याप्रसंगी श्री. पाशा पटेल म्हणाले की कांदा हे महाराष्ट्रातील महत्वाचे पीक असून कांद्याचा उत्पादन खर्च हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. कांद्याबाबत सरकारी धोरण निश्चित करताना शास्त्रीय पद्धतीने नेमका उत्पादन खर्च निश्चित करून शासनाला ठोस शिफारसी करण्यात येतील. यावेळी श्री. पाशा पटेल यांनी कांदा धोरण समितीच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी उपस्थितांना स्पष्ट केली. याप्रसंगी डॉ. बी.टी. पाटील यांनी कांदा पिकाच्या उत्पादकता वाढीबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने तसेच इतर कृषि संशोधन संस्थांनी केलेले संशोधन याबाबत माहिती दिली. यावेळी बैठकीला उपस्थित शेतकऱ्यांनी प्रतिहेक्टरी कांदा उत्पादनासाठी येणाऱ्या खर्चाबाबत माहिती दिली. त्यानंतर डॉ. रोहित निरगुडे यांनी उपस्थित समिती सदस्य आणि शेतकऱ्यांना सादरीकरण केले. शेतकऱ्यांनी मांडलेल्या उत्पादन खर्च आणि शासनाच्या योजनेअंतर्गत विविध प्रक्षेत्रावर नमुना पद्धतीने नोंदी केलेला कांदा उत्पादन खर्च यावर यावेळी तुलनात्मक चर्चा झाली. शेतकऱ्यांचा वाढीव उत्पादन खर्च हा दुबार पेरणीसाठी बियाण्याचा जास्तीचा वापर, अतिरिक्त खते आणि कीटकनाशकांचा वापर केल्यामुळे होत असल्याचे डॉ. थंगा स्वामी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सहप्रमाण दाखवून दिले. यावेळी समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांनीही यावर सहमती दाखवत कृषि विद्यापीठाच्या उत्पादन खर्चाची माहिती योग्य असल्याचा दाखला दिला. या बैठकीला प्रत्यक्ष आणि ऑनलाईन पद्धतीने सहभागी झालेल्या अनेक तज्ञांनी यावेळी झालेल्या चर्चेत सहभागी होत उत्पादन खर्च कमी करणे तसेच नेमका उत्पादन खर्च काढण्यासाठी आवश्यक बाबींवर योग्य शिफारसी कराव्यात अशी मागणी केली. कांदा पीक उत्पादन खर्चामध्ये मजुरीचा खर्च हा मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यावर सविस्तर चर्चा झाली व यामध्ये प्रामुख्याने कांदा लागवडीसाठी लागवड यंत्राची गरज असल्याचे नमूद करण्यात आले. या बैठकीचे सूत्रसंचालन श्री. सुहास काळे यांनी तर आभार डॉ. दत्तात्रय सानप यांनी मानले. या बैठकीसाठी समिती सदस्यांसह कृषि विद्यापीठातील कांदा संशोधनावर काम करणारे अधिकारी, पीक उत्पादन खर्च योजनेचे अधिकारी, कांद्याचे उत्पादन घेणारे कृषिभूषण विष्णू जरे यांच्यासह विविध जिल्ह्यातील १५ शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२५

## डॉ. साताप्पा खरबडे भारत शिक्षण रत्न पुरस्काराने सन्मानित




**दि. ८ सप्टेंबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता तथा संचालक शिक्षण डॉ. साताप्पा खरबडे यांना मानाचा समजला जाणारा राष्ट्रीय पातळीवरचा भारत शिक्षण रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सदरचा पुरस्कार डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन टीचर्स वेल्फेअर असोसिएशन, बंगळुरू यांच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त प्रदान करण्यात आला. शिक्षण, संशोधन आणि विस्तार या क्षेत्रातील डॉ. खरबडे यांच्या २९ वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव म्हणून हा मानाचा पुरस्कार देण्यात आला आहे. डॉ. साताप्पा खरबडे यांचे ११५ शास्त्रीय लेख, १५५ तांत्रिक लेख विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेले असून त्यांनी ३० घडीपत्रिका व दहा पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या नावावर दोन पेटंट आहेत. त्यांनी आतापर्यंत एम. एस. सी. च्या २२ विद्यार्थ्यांना व आचार्य पदवीच्या १२ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले आहे. त्यांनी शेतकऱ्यांसाठी २५ तंत्रज्ञान शिफारशी दिलेल्या असून त्यांनी ४० पेक्षा जास्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिसंवादांमध्ये भाग घेतला आहे. त्यांना आतापर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे १२ पेक्षा जास्त विविध पुरस्कार मिळालेले असून त्यांनी कोलंबो, श्रीलंका व थायलंड या देशांमध्ये शैक्षणिक विषयासंदर्भात परदेशदौरे केलेले आहेत.

डॉ. साताप्पा खरबडे यांना मिळालेला हा पुरस्कार त्यांच्या कृषि शिक्षण, कृषि संशोधन आणि विस्तार शिक्षणात केलेले कार्य व कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि समर्पण वृत्तीचा सन्मान आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात कनिष्ठ संशोधन सहाय्यक म्हणून कार्याची सुरुवात करून डॉ. खरबडे यांनी कृषि महाविद्यालय नंदुरबार, कराड आणि कोल्हापूर येथे सहयोगी अधिष्ठाता म्हणून यशस्वी कामगिरी केली आहे. सध्या ते अधिष्ठाता या पदावर कार्यरत आहेत. डॉ. खरबडे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव श्री. राजेन्द्रकुमार पाटील, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील तसेच विद्यापीठातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेच्या नियामक मंडळाच्या सचिवपदी डॉ. प्रशांत बोडके यांची निवड



**दि. २५ सप्टेंबर, २०२५.** महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यातील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेत उत्साहात संपन्न झाली. यावेळी झालेल्या संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणुकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांची नियामक मंडळाचे सचिव म्हणुन बिनविरोध निवड करण्यात आली.

या सचिवपदाचा कालावधी सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षासाठी असणार आहे. या निवडीदरम्यान संस्थेचे अध्यक्ष माजी कुलगुरु डॉ. व्यंकटराव मायंदे, डॉ. राजाराम देशमुख, माजी कृषि आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, डॉ. रामकृष्ण मुळे, श्री. सुदाम अडसूळ, श्री. अतुल मारणे उपस्थित होते. महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्था, पुणे (Institution of Maharashtra Agricultural Technologists - IMAT) ही एक नोंदणीकृत संस्था आहे, जी कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी कार्य करते. ही संस्था कृषि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी स्वतंत्रपणे कार्य करते. या संस्थेचे उद्दिष्ट कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणे आणि कृषि क्षेत्रातील लोकांच्या क्षमता विकसित करणे हा आहे. या संस्थेद्वारे कृषि क्षेत्रातील

तंत्रज्ञान, प्रगत पद्धती व उपक्रम यांवर आधारित वेबसंवाद, कार्यशाळा आणि इतर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे हा आहे. डॉ. प्रशांत बोडके यांच्या या निवडीबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी अभिनंदन केले.

## आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत कृषि महाविद्यालय, धुळेचे यश






**दि. ४ सप्टेंबर, २०२५.** जैनापूर येथील शरद कृषि महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत धुळ्याच्या कृषि महाविद्यालयाच्या विध्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत २१ महाविद्यालयाच्या १२७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. धुळे महाविद्यालयातुन एकूण ११ विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट कामगिरीबद्दल धुळे कृषि महाविद्यालयाला 'जनरल चॅम्पिअनशिप, उपविजेतेपद मिळाले. या यशात विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये मिळवलेल्या यशाचा मोठा वाटा आहे. वक्तृत्व स्पर्धेत कु. हर्षित देसले हिने प्रथम क्रमांक, वादविवाद (हिंदी) स्पर्धेत कु. ईश्वरी केसकर द्वितीय क्रमांक, वादविवाद (इंग्रजी) कु. शची सिंग आणि तात्काळ वक्तृत्व स्पर्धेत कु. अनिकेत गोसावी या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले. सदरचे पारितोषिक वितरण महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. व्ही. आर. आवारी यांच्या शुभहस्ते झाले. या गौरवशाली विजयानंतर धुळे कृषि महाविद्यालयात परतल्यावर विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यामध्ये महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष प्रा. डॉ. राहुल देसले, विद्यार्थी मुख्य समुपदेशक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. जितेंद्र सूर्यवंशी आणि संघाचे व्यवस्थापक प्रा. डॉ. सुनील पाटील व डॉ. सोनाली गदमले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे दीक्षारंभ कार्यक्रमाचा उत्साहात शुभारंभ

**दि. १६ सप्टेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सहावी अधिष्ठाता समितीच्या अभ्यासक्रमानुसार नव्याने प्रवेश घेतलेल्या कृषि पदवी ऑनर्स विद्यार्थ्यांना कृषि शिक्षणाची आणि महाविद्यालयाची ओळख करून देण्यासाठी हा दोन आठवड्यांचा कार्यक्रम दि. १६ सप्टेंबरपासून सुरू झाला असून तो दि. २९ सप्टेंबर, २०२५ पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य जीएसटीचे डेप्युटी कमिशनर श्री. भानुदास माळी, धुळे महानगरपालिकेचे डेप्युटी कमिशनर श्री. हेमंत निकम उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मुख्य समुपदेशक डॉ. विश्वनाथ शिंदे,
बाजरा संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. खुशाल बऱ्हाटे, वसतिगृह प्रमुख डॉ. सुनील पाटील, डॉ. संजीव वाडीले, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. पी.एस.साखरे, एनसीसी अधिकारी डॉ. पंकज देवरे, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. राखी मेश्राम, डॉ. नितीश घोडके व सहाय्यक निबंधक श्री. राजाराम महाले उपस्थित होते.

यावेळी श्री. भानुदास माळी यांनी प्रमुख मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना वरिष्ठ विद्यार्थ्यांसोबत संबंध कसे असावेत. शिक्षकांसोबत

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

सप्टेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





संबंध कसे असावेत याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थी खुर्चीपासून ते अधिकारी बनण्यापर्यंतचा प्रवास स्वानुभवातून व्यक्त केला. श्री. हेमंत निकम यांनी खेळीमेळीचं वातावरण तयार करून विद्यार्थ्यांना करिअरबद्दल मार्गदर्शन केले. यामध्ये विशेषतः विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कोणत्या वर्षांपासून सुरु करावा, एक उत्कृष्ट उद्योजक कसे बनावे याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. बबनराव इल्हे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विविध कृषि महाविद्यालयातून शिकलेल्या यशस्वी उद्योजकांचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांमधील एक उद्योजक जागा केला. प्रत्येक विद्यार्थी हा काही अधिकारी बनत नाही तर वेळेतच आपल्यामधील कौशल्य ओळखून उदयोजकतेकडे वळावे कारण भविष्यात उद्योजक ही काळाची गरज ठरेल. म्हणूनच ह्या चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाचा पुरेपूर फायदा घेऊन आपल्यातील कौशल्य वाढ कशी करता येतील याकडे लक्ष द्यावे असे मार्गदर्शन डॉ. इल्हे यांनी केले.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यालयातील संपूर्ण टीचिंग अँड नॉन टीचिंग स्टाफसोबत विद्यार्थ्यांची ओळख, विद्यार्थ्यांना संपूर्ण परिसराची ओळख, शैक्षणिक उपक्रमांची माहिती, अभ्यासक्रमाची रूपरेषा तसेच महाविद्यालयाच्या नियम व सुविधांची माहिती देणे होते. हा दीक्षारंभ कार्यक्रम विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करणारा ठरेल असा विश्वास महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. राहुल देसले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. जितेंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार प्लेसमेंट ऑफिसर डॉ. विकास पवार यांनी मानले. उपस्थित सर्व प्राध्यापक व प्रथम वर्षातील नवीन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रमाला सर्व प्रकल्पाचे प्रमुख, संशोधन विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कंत्राटी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे दीक्षारंभ कार्यक्रमाची सांगता



**दि. २५ सप्टेंबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे प्रथम वर्ष कृषि अभ्यासक्रमासाठी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सहाव्या अधिष्ठाता बैठकीच्या अभ्यासक्रमानुसार दीक्षारंभ कार्यक्रमांतर्गत मानसशात्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणुन मानसशात्र व तत्वज्ञान प्रवक्ते प्रा. वैशाली पाटील उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राहुल देसले उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. वैशाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मनसंवाद व आत्मविश्वासाकडे वाटचाल या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की आयुष्यात आपल्याला काय

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

सप्टेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

करायचं आहे? याबाबत ध्येय निश्चित हवे व त्यासाठी नियोजन ,सातत्य, आयुष्याचे वेळापत्रक हवे, स्वतःचा शोध घेता यायला हवा. मी हे करू शकतो तीच इच्छाशक्ती तुमच्या मेंदूला सक्रिय करते. प्रत्येकाच्या मेंदूमध्ये अफाट शक्ती आहे. मानव आपल्या मेंदूचा ठराविकच भाग वापरतो ,म्हणून त्याला काही गोष्टी जमत नाही. विज्ञान सांगते की प्रत्येक माणूस प्रत्येक गोष्ट करूच शकतो. आपल्या मेंदूच्या पेशी जर एकमेकांसमोर जोडल्या तर पृथ्वीला प्रदक्षिणा घालता येईल एवढी ताकद आपल्या मेंदूत असते. पण आपण ती वापरत नाही. अल्बर्ट एडिसन म्हणतो मला जर एखादं काम एका तासात संपवायचं असेल तर मी पन्नास मिनिटं त्या कामाचं नियोजन करतो व दहा मिनिटात काम संपवतो. आयुष्यात नियोजनाला महत्त्व आहे. नियोजनातूनच यशाची वाट दमदार होत असते. जो जितका ज्ञानवंत तो तितका श्रीमंत ही आजची खरी श्रीमंतीची व्याख्या आहे.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बबनराव इल्हे म्हणाले की, प्रा. वैशाली पाटील यांचे मार्गदर्शन खरोखरच तरुण मुलांना विचार करायला लावणारे आहे. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी जर तुम्ही तुमच्या जीवनात साकारल्या तर निश्चितच तुम्हाला यशोगाथा रचता येईल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल देसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रथम वर्षाचा विद्यार्थी कु. सत्यजित मुळे याने केले. सदर कार्यक्रमात कृषि महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी व प्रथम वर्षातील १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

## कृषि महाविद्यालय, कराड येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिवस व दीक्षारंभ कार्यक्रम संपन्न





**दि. २४ सप्टेंबर २०२५.** यशवंतराव चव्हाण शासकीय कृषि महाविद्यालय, कराड येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस व दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कराड शहर वाहतूक पोलीस विभागाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंदिरा घोणमोडे उपस्थित होत्या. यावेळी कराड येथील कृषि संशोधन केंद्राच्या प्रभारी अधिकारी डॉ. राणी निंबाळकर, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना ताठे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाळके, डॉ. नंदकिशोर टाले, डॉ. अतुल कुंभार व सहाय्यक कुलसचिव व सहाय्यक नियंत्रक श्री. आर. पी. चोथे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. इंदिरा घोणमोडे म्हणाल्या की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या देशासाठी सर्व प्रकारचे सामाजिक योगदान देण्यासाठी कार्यरत राहावे. याप्रसंगी श्री. संदीप सूर्यवंशी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की समाजामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःशी प्रामाणिक राहून व वेळेचे महत्त्व जाणून जीवनाची वाटचाल करावी. सध्या मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य बिघडलेले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर मर्यादित व चांगल्या कामासाठीच करावा. धार्मिक गैरसमज व आर्थिक फसवणूक मोबाईलमुळे होणार नाही याची काळजी घ्यावी. सुदृढ व निकोप समाजासाठी विद्यार्थ्यांनी काम करावे. यावेळी डॉ. राणी निंबाळकर, डॉ. अर्चना ताठे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्योती वाळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदकिशोर टाले यांनी तर आभार डॉ. अतुल कुंभार यांनी मानले. यावेळी कृषि महाविद्यालयाचे तसेच कृषि संशोधन केंद्राचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कराड येथील कृषि महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १८ सप्टेंबर २०२५.** कराड येथील यशवंतराव चव्हाण शासकीय कृषि महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ–२०२५ या शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत कृषि उद्योजकता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्याख्याते म्हणून न्यूट्रीग्लोब ऑरगॅनिक या संस्थेचे उद्योजक श्री. नमित पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. इंदिरा घोणमोडे उपस्थित होत्या. याप्रसंगी डॉ. ज्योती वाळके, डॉ. ए. आर. मोहिते, डॉ. एम. एम. बर्गे, डॉ. एन. एन. टाले, डॉ. यु. एस. बोदर व सहाय्यक कुलसचिव व सहाय्यक नियंत्रक श्री. आर. पी. चोथे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. इंदिरा घोणमोडे म्हणाल्या की नाविन्यपूर्ण शेती पद्धतीची कास व आत्मविश्वास असल्यास कृषि पदवीधर एक यशस्वी कृषि उद्योजक होऊ शकतो. याप्रसंगी उद्योजक श्री. नमित पाटील म्हणाले की नोकरीच्या पाठीमागे न लागता आणि कृषिची आवड असल्याने एक स्वतंत्र कृषि उद्योजक म्हणून काम करायचे होते. आरोग्यदायी समाज, आर्थिक स्थैर्य व नाविन्यपूर्ण कौशल्य या त्रिसूत्रीनुसार स्पिरुलिना या पूरक आहार गोळीचे उत्पादन सुरू केले. स्पिरुलिनामध्ये प्रथिने, खनिजे, जीवनसत्व, बी कॉम्प्लेक्स, लोह, फाइटोसायनिन हे महत्त्वपूर्ण घटक असल्याने ही एक सुपरफुड म्हणून सर्व वयोगटातील लोकांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. जोखीम पत्करण्याची क्षमता, सकारात्मक विचार, वेळेचे नियोजन, संवाद कौशल्य, उद्योग विस्तार व कौशल्य शिक्षण या बाबी अंगीकृत केल्यास यश आपलेच आहे. कमी जागेत, कमी पैशात व बाजारपेठेचा अभ्यास करून हा उद्योग सुरू करता येतो असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्योती वाळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ए. आर. मोहिते यांनी तर आभार डॉ. एम. एम. बर्गे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयातील तसेच कृषि संशोधन केंद्रातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## कोल्हापूर येथील कृषि महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन

**दि. २६ सप्टेंबर २०२५.** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासातून उद्यमशीलता वाढावी तसेच विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने या दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. भारत कोलगणे, डॉ. भरत भालेराव, डॉ. ज्ञानेश्वर पतंगे व प्रा. मुकुंद गुंड उपस्थित होते.



यावेळी श्री. अमोल येडगे मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन व महाविद्यालयीन

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५७, सप्टेंबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



स्पर्धांमध्ये भाग घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करायला हवेत. यावेळी डॉ. भरत भालेराव यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना योग व मानसिक विकास, कृषि उद्योग आणि कृषि मालाची निर्यात, स्पर्धा परीक्षा, आरोग्य व प्रथमोपचार, स्वसंरक्षण आणि निर्भया पथकाची माहिती, रस्ते सुरक्षा व वाहतूक नियम अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भारत कोळगणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुकुंद गुंड यांनी तर आभार डॉ. ज्ञानेश्वर पतंगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूर येथील कृषि महाविद्यालयात एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**दि. २० सप्टेंबर २०२५.** कोल्हापूर येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात गुळ उद्योगात उद्योजकता आणि निर्यातीच्या संधी या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन कृषि महाविद्यालय, अखिल भारतीय काढणीपश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान प्रकल्प आणि प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती योजनेअंतर्गत या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड यांच्या हस्ते झाले. या एकदिवसीय प्रशिक्षण सत्रात श्री.रवींद्र शिरोलकर, डॉ. जी. बी. येगे, श्रीमती नीता पाटील, डॉ. विद्यासागर गेडाम यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थ्यांना कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस. एस. कांबळे त्यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. डॉ. डी. डी. सावळे, डॉ. बी. टी. कोलगणे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुकुंद गुंड यांनी केले. या कार्यक्रमासाठी ४५ अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील कृषि पदवीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

**दि. २५ सप्टेंबर, २०२५** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव, ता. जामखेड येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये कृषि पदवीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून यशस्वी दुग्ध उद्योजक व लोकविकास डेअरी, वांगी, ता. करमाळा येथील चेअरमन श्री. दिपक देशमुख उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डॉ. गोकुळ वामन, डॉ. दीपक वाळुंजकर, डॉ. उत्कर्ष गवारे व डॉ. प्रणाली ठाकरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध उपक्रमांबाबत माहिती दिली.





नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सर्व उपक्रमात शैक्षणिक, सांस्कृतिक, मैदानी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना मोठे ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन त्यादृष्टिने कष्ट करावे, त्यात सातत्य ठेवावे व यशस्वी होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे  याबाबत मार्गदर्शन केले. श्री. दीपक देशमुख आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती व्यवसायात खूप अडचणी भेडसावतात, परंतु शेतकऱ्यास या सर्व प्रश्नांवर मात करुन पुढे जावे लागते. तुम्ही सर्व विद्यार्थी भाग्यवान आहात की तुम्हांस शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यास प्रवेश मिळालेला आहे. परंतु शेतीकडे व्यावसायिक माध्यमातून बघणे ही आज काळाची गरज झालेली आहे, त्यामुळे व्यावसायिक दृष्टिकोन समोर ठेवून सर्व विद्यार्थ्यानी आपले शिक्षण घ्यावे व कृषि उद्योजक बनावे.

या कार्यक्रमादरम्यान प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी आपला परिचय उपस्थित मान्यवरांना करून दिला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोकूळ वामन यांनी केले. प्रमुख अतिथीची ओळख डॉ. उत्कर्षा गवारे यांनी करुन दिली. सूत्रसंचालन डॉ. प्रणाली ठाकरे तर अर्चना महाजन यांनी आभार प्रदर्शन केले.सदर कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नव्याने प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी, हाळगाव व जवळा गावातील प्रगतशील शेतकरी, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**प्रकाशक** : डॉ. गोरक्ष ससाणे
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : डॉ. सचिन सदाफळ
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : श्री. सुनिल राजमाने
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८०१/२०२५